सेवेशी दर्शनास लवकरच येतो. सर्व समर्थांचे कृपेचे फळ आहे. जास्त काय लिहूं."

Letter dated 14th June 1915 from Vasudeo Anant Gokarn Mahableshwar to Shti

" ह्याचे पूर्वी आपण मला पुष्कळदा अनुभव दिलेला आहे. त्या कारणाने हे पत्र आपणास लिहीत आहे."

Letter from Mr R. C. Bajpai dated Bombay 16th March 1922 to me.

"On the very day of my arrival, I got a loving letter from my father......... . .........I pray to Babajee day and night to conciliate his mind towards me and this letter shows that I expect some happy news after my return to Bombay because I got such satisfaction in visiting Baba's Shrine that my worn-out energies have become fresh"

## रा. रा. वामन भा. पटेल.

मु. अमदाबाद.

रा मथूरादास हीरजीदास मु. अंजनवेल. कृतानेक सा. न. वि. वि- ता॥ ४।२ चे पत्र पावले. मजकूर समजला. मला श्री. सद्गुरू साईनाथ महा. राज याचा अनुभव.

१ शके १८३९ सालीं माझेवर कांहीं आरोप येऊन संकट फार आले त्यावेळीं महाराजांस विचारिता आपोआप निवारण होईल असे सांगि- तले त्याप्रों १ पै खर्च न होतां आपोआप निवारण जहाले.

२ शके १८३६ पौषमासीं माझा मुलगा लहान अती सीक जहाला. त्याच दिवशीं बाहेरगावीं असतांना दृष्टांत जहाला (स्वप्नात) मुलगा फार सीक पण काळजी नको बरा होईल त्याप्रमाणे घरीं गेल्यावर जहालेली हकी- कत म्हटल्याप्रमाणे मुलगा सीक होऊन बरा झाला.

३ श. १८४० चैत्रमासीं शिरडी मुकामीं सगुणचे खाणावळींत बसून एका भक्ताच्या हातून कांहीं वाईट गोष्टी घडलेल्या दुसरा ईसम मला सांगत होता व मी विचारून घेत असतां महाराजांनीं मला मुद्दाम बोलावून तूं कोठे बसला होतास? जवळ कोण होता? काय करित होतास? असें विचारिलें. पूर्वीं असे केव्हांही विचारिले नव्हतें. यावरून त्या गोष्टी मी ऐकणें त्यांना रूचल्या नाहींत असे मला वाटल्यावरून पुन्हा मी तो विषय सोडून दिला.

४ श १८३९ सालीं मला तृतीय लग्न करण्याचे कामीं सांगितल्या- प्रमाणें अनुभव येऊन १८४० सालीं लग्न जहालें.

५ माझा त्यांचा परीचय ४ वर्षें; त्यांत विशेष परीचय असा १ वर्षच होता.

६ श १८४० आशाढ मासीं माझी बहीण सीक फार होती. पत्राने विचारिले. आजार पार जाऊन त्यांणी सांगितल्याप्रमाणे ती बरी जहाली.

७ श १८४० चैत्र मातू सीक फार, पत्राने विचारिलें. त्यांनीं सांगि- तल्याप्रमाणे बरा जहाला.

ह्याप्रमाणें मला आलेला अनुभव लिहिला आहे. प्रसिद्ध करावयास हरकत नाहीं. क. लो. हे. वि०

आ. मथुरादास हीरजीदास अंजनवेल.

## श्री. हरि सीताराम दीक्षित बी. ए. एल. एल. बी. यांजकडून लिहून आलेले महाराजांचे अनुभव.

गतवर्षी मी एका नातलगाच्या येथे जेवावयास गेलो असता तेथे एका असिस्टंट एंजिनियराची गाठ पडली. त्यांनीं भाविकपणाने बाबाच्या संबंधाने हकीगत मला विचारली आणि मला त्यावेळेला सुचली त्याप्रमाणे मी ती त्याना सागितली. त्यावरून त्याचे मनात महाराजांविषयी श्रद्धा उत्पन्न झाली. पुढे ते लौकरच त्या गांवाहून बदलून दुसऱ्या गावीं गेले. त्यानंतर सुमारे चार महिन्यांनी त्याची माझी गांठ आगगाडींत झाली. गोष्टी बोलता बोलता असे कळलें कीं त्यांना फिरून दुसरे नवे ठिकाणीं बदली झाल्याचा हुकुम मिळाला होता, आणि ती बदली त्यांना अत्यंत अनिष्ठ असल्यामुळे बदलीचा हुकुम रद्द झाल्यास पाहावा या हेतूने प्रयत्न करण्यास ते आपल्या वरिष्ठाकडे चालले होते. परंतु बदली हुकुम रद्द होण्याची त्यांना बिलकुल आशा वाटत नव्हती. त्यांची महाराजांवरची श्रद्धा पाहून मी त्यांना महाराजाची उदी व एक लहान फोटो दिला. पुढे माझे स्टेशन आल्यावर मी उतरलो आणि ते पुढें गेले. पुढे सुमारे दोन महिन्यानीं मी एका स्टेशनावर आगगाडींतून उतरलो तों ते असिस्टंट एंजिनियर त्याच आगगाडींत बसावयास आले. त्यांनीं मला दुरून पाहिल्याबरोबर झपाट्यानें मजकडे आले आणि खिशांतून पांच रुपयांची नोट काढून मजजवळ दिली आणि म्हणाले, "बाबांची दक्षणा म्हणून जमा करा. मागे तुम्ही मला फोटो व उदी दिली ती घेऊन मी गेलों होतों त्यावेळीं माझ्या वरिष्ठांना, बदली मला फार अडचणीची होईल,' असे मी म्हटल्याबरोबर ते म्हणाले, ' बरे तर बदली रद्द करितो. तुम्ही आहात तेथेंच रहा.' अर्थात् यामुळे मला फार आनंद झाला आणि ही बाबांचीच कृपा अशी माझ्या मनाची खात्री झाली."

श्री साईलीला वर्ष २ अंक ६ यांतील स्फुट पृ० १३६ वर
प्रसिद्ध केलेल्या शिर्डी संस्थान कमिटीच्या
ठरावाअन्वयें प्रसिद्ध करण्यांत येतें कीं,

श्री सद्गुरू साईनाथ महाराज यांच्या पायघडीची बनात मागे सुमारें दोन वर्षांपूर्वी विकली गेली हे आपल्यास ठाऊक आहेच. त्या बनातीवर एक जरीची साडी अंथरली जात असे. त्या साडीचे कांठ बरेचसे फाटल्यामुळे, तसेच महाराजाचे अंगावर चावडींत जाताना जे शेले घातले जात असत त्यापैकीं दोन शेल्यांचे काठ असेच फाटल्यामुळे ती साडी व ते दोन शेले विकावे असे संस्थान कमिटीने ठरविले आहे. या तिन्ही जिनसा वांद्रे येथे रा. रा. गोविंद रघुनाथ दाभोळकर शिर्डी संस्थानचे खजीनदार याचे घरीं ( ५ सेंट मार्टिन्स रोड ) भक्तमंडळींना पहाण्यासाठीं ठेवल्या आहेत. या जिनसांपैकीं कोणतीही जिन्नस घेण्याची आपली इच्छा असल्यास ता. १० जानेवारी १९२५ चे आंत आपली मागणी काय असेल ती लेखी सदर खजिनदार यांस कळवावी आणि ता. १८ जानेवारी १९२५ रोजीं दुपारीं ३ वाजतां वांद्रे येथे सदर ठिकाणीं हजर व्हावे अथवा आपल्यातर्फे कोणास पाठवावें. आपली मागणी कमिटीनें कबूल केल्यास आपण मागितलेली जिन्नस किंमत घेऊन आपल्यास, किंवा आपण लेखी अधिकार देऊन ज्याला पाठवाल त्यास तावडतोब देण्यांत येईल. कळावे, लोभ असावा हे विनंती.

हरि सीताराम दीक्षित,
सेक्रेटरी.

## श्री पुण्यतिथि उत्सव.

वरील उत्सव यंदाही महाराजाचे कृपेने चागल्या तऱ्हेने पार पडला. उत्सवासाठीं निरनिराळ्या ठिकाणाहून बरीच मडळी आली होती त्यांमध्ये मुंबईचे रा. रा. रामकृष्ण श्रीकृष्ण नवलकर बी. ए. एल् एल् बी. हायकोर्ट वकील ( साठयाच्या वाडयाचे सध्याचे मालक ).

,, रामचंद्र आत्माराम तर्खड आणि त्यांचे कुटुंब.

,, आनंदराव शामराव प्रभाकर.

,, रघुवीर भास्कर पुरंदरे.

,, मोरेश्वर बाळकृष्ण चवाण.

,, दिनकर मोरेश्वर पाटकर

,, मंगेश मोरेश्वर पाटकर.

,, डी. जी. वैद्य व त्यांचें कुटुंब

,, काशिनाथ गणेश वैद्य व त्यांचें कुटुंब

,, सच्चिदानंद नथुराम मोखाले

,, वासुकाका साठे

,, गजानन महादेव कोळवणकर

श्री० नानीबाई आणखी कांहीं पारशी गृहस्थ आणि एक पारशी बाई.

पुण्याचे:—

रा. रा. गोविंदराव गाडगीळ ब्यारीष्टर व त्यांचें कुटुंब.

" नानु पुरुषोत्तम अवस्ती व त्यांचें कुटुंब.

खांडव्याचे -

रा. रा. पुरुषोत्तम बिहारीलाल व्यास आणि नागपूरचे श्रीमंत बुटी साहेबांच्या पेढीचे मुनीम.

रा. रा. निळकंठराव गडी काठीकर आणि त्याच पेढी पैकीं रा. रा. जोगळेकर हेही होते. संस्थानचे चिटणीस. रा. रा. हरि सीताराम दीक्षित हेही हजर होते. राहते, पिंपळवाडी, येवले वगैरे आजुबाजुच्या ठिकाणाहूनही बरीच मंडळी आली होती. तसेच मोगलाईंतील परभणी जवळील मुळी वगैरे गावाहून पस्तीस असामींची दिंडी घेऊन जगन्नाथबुवा आले होते. हे जगन्नाथबुवा पूर्वी महाराज देहधारी असताना महाराजांच्या घोड्याची चाकरी करीत असत. महाराजांच्या कृपेनें त्यांचा अधिकार बराच वाढून आज बरीच मंडळी त्यांच्या भजनीं आहेत.

उत्सवाची सुरुवात रविवार ता. ५ पासून झाली पण ता. ५ व ६ ला काहीं नियमित कार्यक्रम नव्हता. तरी पण दोन्ही दिवस मंदिरांत तिसरे प्रहरीं व रात्रीं पुराण झालें. आणि ता. ६ चे रात्रीं ह. भ. प. मारुतिबुवांचे सुश्राव्य कीर्तन झाले. त्याच दिवशीं दुपारीं व संध्याकाळीं जगन्नाथबुवांच्या मंडळीचें अति प्रेमळ भजन झालें. पुण्यतिथीच्या दिवशीं म्हणजे मंगळवार ता. ७ रोजीं महाराजांना रुद्राभिषेक झाला. सर्व भक्तमंडळींनीं महाराजांच्या समाधीला अभ्यंग स्नान घातलें. नंतर रा. पुरंदरे व रा. पुरुषोत्तमराव वगैरे मंडळी भजनमंडळीसह गांवांत भिक्षेला गेली. भिक्षेहून आल्यानंतर ह. भ. प. मारुतीबुवांचें कीर्तन होऊन नंतर दोनप्रहरची आरती झाली. आराधनविधि गतवर्षी प्रमाणेंच करण्यांत आला. यंदाचा आराधनविधि रा. भाऊ बळवंत भाटये, ( कै. बाळासाहेब भाटयांचे ज्येष्ठ चिरंजीव ) यांचे हाताने झाला. विधिपूर्वक ज्या चार ब्राह्मणांला क्षण देण्यांत येतो त्यांचें पंचपक्वान्नाचें भोजन चालू असता श्री० हरि सीताराम दीक्षित व श्री० जी. के. गाडगीळ यांनीं नारायणोपनिषद म्हटलें. सर्व विधि झाल्यावर गांवांतील ब्राह्मण मंडळी व इतर शिष्ट मंडळी, तसेच बाहेरून आलेली सर्व भक्तमंडळी यांना पंच पक्वान्नांचे जेवण झालें. रात्रीं रथाची मिरवणूक निघाली ती दीक्षितांच्या वाडयाजवळ आली. तेव्हां तेथें सुमारे एक तास भजन, गारुड झाले आणि मग मिरवणूक संपल्यावर शेजारती झाली. दुसरे दिवशीं म्हणजे बुधवार ता. ८ रोजीं सार्वज-

निक भंडारा झाला. तेव्हा हजारांचेवर मंडळी जेवली. रात्री मशिदींत ह० भ० प० आपाजीबुवा मातुळठाणकर याचे कीर्तन होऊन तेथून पालखी चावडींत नेली. तेथे आरती होऊन पालखी मंदिरांत नेली, आणि तेथे शेजारती झाली. तिसरे दिवशीं म्हणजे गुरुवार ता. ९ रोजीं संध्याकाळीं मशिदीत ह. भ. प. भिमाजीबुवा पिंपळवाडीकर याचे श्रवणीय कीर्तन झाले. रात्रीं पालखी चावडींत नेऊन तेथे आरती झाल्यावर मग गांवात मिरविण्यांत आली. दीक्षितांचे वाड्याजवळ सुमारे दीड तास भजन, गारुड, भारुड, सोंगे वगैरे बरेच आनंदाचे प्रकार झाले नंतर पालखी मंदिरात नेल्यावर तेथे शेजारती झाली. शुक्रवारीं सकाळीं काल्याचे कीर्तन ह० भ० प० मारुतीबुवा यांनीं केले ते फार चांगले वठले. नंतर आरती होऊन आलेल्या सर्व भक्त मंडळीचे भोजन होऊन बहुतेक मंडळी आपापल्या गावांकडे निघून गेली.

उत्सवाप्रीत्यर्थ जमलेली वर्गणी आणि झालेला खर्च याचा हिशेब पुढे प्रसिद्ध करण्यांत येईल

पुण्यतिथीचे दिवशींच महाराजांचे भक्त कै० अमीदास मेहता उर्फ बावानंद याच्या समाधीवर पादुका बसविण्याचा समारंभ झाला. हा समारंभही प्रेक्षणीय झाला. समारंभास महाराजांची बहुतेक भक्तमंडळी हजर होती.

## मुंबईच्या उत्सवाची हकीकत रा. रा. दाजी विठ्ठल सांबारे यांनीं लिहून पाठविलेली:—

### श्रीसमर्थ मल्लिनाथ समर्थ.

मुंबई येथे चिखलवाडींत जावजी बिल्डिंगमध्ये रा. दाजी विठ्ठल सांबारे, व्हि. के. देसाई, यशवंतराव बांबर्डेकर वगैरे महाराजांची कांहीं भक्त मंडळी राहतात. गुदस्त सालाप्रमाणे यंदा पुण्यतिथीचा उत्सव मोठ्या थाटाने पार पडला.

पुण्यतिथीचे दिवशी सकाळीं नित्य नियमाप्रमाणे पूजा अर्चा झाल्यावर श्रीसाईमहाराजांचे तसबिरीसमोर रा. रा. विठ्ठलराव कल्याणपुरकर यांचे भक्तिरसपरिपूर्ण असे भजन दुपारी १२। ते संध्याकाळीं ५। पर्यंत झाले. यांचे भजनात बहुतेक सर्व श्रीसाईबाबाची स्तुती चालू असून त्यांचे नावाचा सारखा जयघोष चालू होता. सर्व श्रोते मंडळींनीं त्यात भाग घेतला असल्यामुळे भजनास विशेष शोभा आली होती. ही सर्व संधी रा. विठ्ठलराव यांचे मार्फत श्रीसाईकृपेने श्रोतेजनास भरपूर श्रवण करण्यास दिली गेली. अशीच वरचेवर सेवा घडवून आणण्यासाठीं श्रीसाईबाबानीं भक्तास उमेद देत असावी.

यंदा रा. रा. नारायणराव ठोसर हे मुद्दाम पार्ल्याहून या ठिकाणी उत्सवास हजर होते. त्यांचेबरोबर रा. रा. स्वामिनाथराव हेही होते.

## श्री साईबाबांचे बोल ( पुढें सुरू )

माझी एकच घोडयाची बगी आहे, पण तो एक घोडा दहाबारा माणसाना घेऊन जातो.

दोरी सद्गुरुच्या हातांत एकदा दिली म्हणजे काळजी करण्याचे कारण नाहीं.

आनंदात आहे असेच म्हणावे.

पोटात कांटे भरावें पण महाराच्या येथे जेऊं नये.

अंगात महार आहे तो काढून टाकावा.

इकडची दुनिया इकडे झाली तरी आपण स्वस्थ बसावे व मौज पहावी.

कोणाचे होऊन रहावे किंवा कोणाला आपले करून राहावे.

जिन्ने पाया उन्ने छिपाया.

या मासिकांत आरंभापासून प्रसिद्ध होत असलेल्या श्रीसाईसच्च-
रितावर रावबहादूर श्री. चिंतामणराव विनायक वैद्य एम्. ए.
एल्. एल्. बी. कल्याण याचा **अभिप्राय.**

साईलीला मासिकांत येणारे रा. दाभोळकर गोविंद रघुनाथ हे लिहीत असलेले श्रीसाईसच्चरित मी मोठ्या प्रेमानें वाचतो. या चरित्रांत भक्ति व ज्ञान या दोहोचें उत्तम आविष्करण होत आहे. व ते अनुभवाच्या मार्गानें होत असल्यानें ग्रंथाची भाषा गोड व गंभीर अशीच येत आहे. ओव्यातील चारी यमकें सहज प्रयत्नाविना साधलेलीं असतात, व विषयही मनोवेधक रीतीनें मांडलेला असतो. श्री–साईचरित्राला मला वाटते, हेमाडपंत हे महिप-तीच लाधले आहेत. संतचरित्र गाण्यास काव्य व भक्तिरसाची जोड नेहमीच लागते व या दोहोंचाही मिलाफ या चरित्रांत चांगला व्यक्त होतो."

(३२)

काल रात्रीं स्वप्न फार वाईट पडले. मशिदींत पाच मुडदे दिसले. मी ओरडलो. मग मला म्हाळसापतीने उठविले.

(३३)

मी एका खाटकाचे येथे नोकरी केली. शंभर रुपयाच्या बकऱ्याची सागुती करावी व त्याचे सवादोनशे रुपये मिळवावे. मला चार रुपये रोज देत होता. स्वैपाकाचीही नोकरी केली. या हाताने फार नेकी केली आहे.

(३४)

चारचारशे रुपयाच्या पन्नास पेट्या पटांगणांत होत्या. मी तेल्याला, वाण्याला, भंग्याला, फकीरबाबाला, बापूसाहेबांना, सगळ्याला म्हटले या पेट्या घेऊन जा; पण कोणी नेईना. मग त्यातल्या तीन पेट्या कोणी घेऊन गेला. मग राहिलेल्या पेट्या मी उचलून कोंडाजीच्या घरात ओट्यावर नेऊन ठवल्या. तेव्हा तो घरातला मला शिव्या देऊं लागला आणि म्हणाला तूंच या पट्या खाल्यास, तूंच पेट्या जिरवल्यास. तो मला आईवरून व बायको-वरून शिव्या देऊं लागला. मी म्हटले मला कोण आहे ! होती ती तर मारून टाकिलीस. तो मला म्हणतो तू चालला जा. रात्रींच चालला जा. भाकर पैसा नसला तर काय झाले.

(३५)

काल जेवताना साखरभात होता तो खाण्याविषयीं मला फकीरबाबा आग्रह करीत होते. मला बाळाभाऊची आठवण झाली म्हणून मी तो साखरभात खाल्ला नाहीं. रात्रीं मला स्वप्न पडलें आणि मला विचारलें साखरभात आहे कारे ?

(३६)

आंब्यांनीं झाड लादलें होते पण ते आंबे फार उंच होते. पुष्कळ लोकांनीं प्रयत्न केला पण व्यर्थ. शेवटीं एका ब्राह्मणाने शिडया बिडया लावून चार आंबे तोडले. पण ते त्याला बाधले. आमच्या भिंतींत एक झाड होतें. त्यालाही पुष्कळ आंबे होते. पुष्कळ लोक नेत.

(३७)

बगी—साहेब दोन घोडयाच्या बगींत पैसा भरून नेत होता. मी म्हटले मी बगीबरोबर येतो. साहेब म्हणाला तूं घोडयाबरोबर चालशील.

मी म्हटलें होय. मग बगी पुढे व मी मागोमाग असे जाऊं लागलो. मग घोडे पळायला लागले मग मी बाजूला होऊन पळूं लागलो; शेवटीं एक घोडा रस्त्यावर पडला आणि दुसरा पाण्यात पडला. आणि बगी मोडली. मी साहेबाला घोडयाना पाहून आणावयाला सांगितले. तो म्हणाला, पैवयाला टाकून कसा जाऊं. मी म्हटले काहीं हरकत नाहीं. मी आहे येथे. नंतर तो गेला. पण त्याच्याने काहीं झाले नाहीं. मग मी गेलो. घोड्याच्या पाठीवरून हात फिरविला, घोडा हुशार झाला आणि बगी चालू झाली.

( ३८ )

बिडास आदितवार पेठेंत तक्याजवळ गेलो. तेथे एक माणूस आला तो म्हणाला येथें राहूं नका. येथे एक बाबा (नाग) आहे. त्यानें परवांच दोन गाई खाल्ल्या आमच्या गोठ्यांत चला. तेथें बैल आहेत. तेथें बैलाजवळ जाऊन आनंदाने निजलो. या माणसानें भाकर आणून दिली, ती ही खाल्ली. दुसऱ्या दिवशीं पुन्हा तक्यापाशीं आलो. तेथे झाडे होती त्यापैकीं एका झाडाकडे लक्ष गेलें त्यात पोकळी होती, आणि आंत उतरण्यास खिड-होती. झाडांत खालची जमीन चागली होती. त्याच्यावर एक पाट बसविला तो गच्च बसला दुसरा पाट खिडींत बसविला तो ही गच्च बसला. पण वर थोडी फट राहिली. त्यात माझी गोदडी भरली मध्यान्ह रात्रीं शेजारच्या झाडींतून तो नाग निघाला त्यानें माझ्या झाडाभोंवती गरका दिला. पण आंत शिरायला त्याला वाट नसल्यामुळें तो पुन्हा आपल्या झाडांत जाऊन बसला. मग उजाडल्यावर बैल तिकडे आले. तेव्हां मी बाहेर निघालों. रात्रभर मांडी घालून बसल्यामुळें पहिल्यांदा त्रास झाला. पण मग बाहेर निघाल्यावर चालतां येऊं लागलें मग तेथें उद जाळला, फुलाची माळ वाहिली आणि शिरणी वाटली आणि मग तेथून गेलों. मग प्रेमचंद शेटच्या येथें कांहीं महिनें होतों. मग पंढरपूरास कांहीं मंडळी निघाली मीही त्यांचे बरोबर निघालों. तिसरे प्रहरीं गांव लागण्याचा संभव दिसेना तेव्हां मी परत बीडास गेलों; रात्रभर ओट्यावर निजून राहिलो मग. सकाळीं शिपायाने आपल्या घरीं ठेविलें.

# अध्याय २४ वा.

श्रीगणेशायनमः । श्रीसरस्वत्यैनमः ॥ श्रीगुरुभ्योनमः ॥
श्रीकुलदेवतायैनमः । श्रीसीतारामचंद्राभ्यांनमः ॥
श्रीसद्गुरु साईनाथायनमः

गताध्यायांतीं दिधलें वचन । साईनाथ गुरुकरुणाघन ॥
थट्टामस्करींतही देती शिकवण । कैशी ती कथन करितों मी ॥ १ ॥

कथन करितों हा अहंकार । असावें गुरुपदीं निरहंकार ॥
तेणेंची कथेशीं पाझर । फुटतो सादर सेवावा ॥ २ ॥

नित्य निर्मल निष्कलमष । साधू सज्जन महापुरुष ॥
स्वच्छ निरभ्र जैसें आकाश । शुद्ध निर्दोष तैसे ते ॥ ३ ॥

महाराज साईचें भजन । स्वार्थ आणि परमार्थ साधन ॥
स्वस्वरूपीं अनुसंधान । समाधान अन्तरीं ॥ ४ ॥

जया मनीं स्वहित साधणें । कथेसीं आदर धरावा तेणें ॥
सहज परमानंद भोगणे । सार्थक साधणें जीवाचें ॥ ५ ॥

श्रवणें लाभेल निज विश्रांती । निरसेल भवभयाची भ्रांती ॥
होईल परमानंद प्राप्ती । श्रोतियां सद्गति रोकडी ॥ ६ ॥

अंतरसाक्ष साईसमर्थ । पूर्ण जाणे भक्तभावार्थ ॥
संपादूनि निजकर्तव्यार्थ । वचन निर्मुक्त होईल ॥ ७ ॥

बुद्धिप्रेरक साईसमर्थ । तेच वदविती निज वचनार्थ ॥
कथीन यथामति तद्भावार्थ । स्वार्थ परमार्थ साधक ॥ ८ ॥

नव्हे अंध, ना रातांधळे। डोळे असोन जन आंधळे ॥
केवळ या देहबुद्धीचिया बळें। निज हित न कळे तयांतें ॥ ९ ॥

देहतरी हा आहे ऐसा। नाहीं क्षणाचाही भरंवसा ॥
पसरितों मी पदरपसा। क्षणैक रसा चाखाया ॥ १० ॥

थट्टाविनोदीं सकळा प्रीती। बाबांची तो अलौकिक रीति ॥
थट्टेतूनही सारचि ठसविती। हितकारक ती सकळांना ॥ ११ ॥

जन थट्टेच्या नादीं न भरती। परी बाबांच्या थट्टेसीं लांचावती ॥
कधीं कीं आपुले वाट्यास येती। वाटचि पाहती आवडीनें ॥ १२ ॥

थट्टा कोणास बहुधा नावडे। परी ही थट्टा परम आवडे ॥
वरी अभिनयाची जोड जंव जोडे। कार्यचि रोकडें तें साधे ॥१३॥

सहज अभिनय अभ्यास। सस्मित वदन नयन विलास ॥
इहीं जवं थट्टेंत भरे रस ॥ तियेची सुरसता अवर्ण्य ॥ १४ ॥

आतां कथितों एक अनुभव। कथा अल्पबोध अभिनव ॥
थट्टेपोटीं परमार्थोद्भव। शब्दगौरव परिसातें ॥ १५ ॥

आठवड्याचा प्रति रविवार। शिरडीस भरतो मोठा बाजार ॥
पाल देऊनि उघड्यावर। उदीम व्यापार चालतो ॥ १६ ॥

तेथेंच मग रस्त्यावर। भाजीपाल्याचे पडती ढिगार ॥
तेली तांबोळी यांचें संभार। चव्हाट्यावरीं बैसती ॥ १७ ॥

ऐशा त्या एका रविवारीं। बाबांचे पाशीं दोन प्रहरीं ॥
करितां पादसंवाहन करीं। नवल परी वर्तली ॥ १८ ॥

तो दोन प्रहरचा दरबार। नित्यचि भरे बहुचिकार ॥
त्यांत बाजार आणि रविवार। लोक अनिवार लोटले ॥ १९ ॥

---

१ हातांची अंजुळी.

उजू बाबांचे सन्मुख बैसून। वांकवूनिया खालीं मान ॥
करीत होतों मी पादसंवाहन। नामस्मरण समवेत ॥ २० ॥

माधवरावजी वाम भागीं। वामनराव दक्षिणांगीं ॥
श्रीमंत बुट्टी तये जागीं। सेवेलागीं बसलेले ॥ २१ ॥

काकाही होते तेथेंच बसले। तितक्यांत माधवराव हंसले ॥
कां अण्णासाहेब हे येथें कसले। दाणे हे डसले दिसताती ॥ २२ ॥

ऐसें म्हणूनि कोटाची अस्तनी। बोटानें स्पर्शतां माधवरायांनीं ॥
कोटाचिया बळियांमधूनि। दाणे वरूनि आढळले ॥ २३ ॥

तें काय म्हणून पाहूं जातां। डावें कोपर लांब करितां ॥
फुटाणे दिसले खालीं गडबडतां। मंडळी टिपतां देखिली ॥ २४ ॥

टिपून टिपून गोळा केले। पांच पंचवीस फुटाणे भरले ॥
तेथेंच थट्टेस कारण उद्भवलें। ऐसें घडलें कैसेंनी ॥ २५ ॥

तर्कावरीं चालले तर्क। जो तो विचारांत झाला गर्क ॥
फुटाण्यांचा कोटाशीं संपर्क। विस्मय समस्तां जाहला ॥ २६ ॥

खाकी कोटाच्या वळ्या त्या किती। त्यांत हे दाणे कैसे सामावती ॥
आलेच कोठून कैशा स्थिति। न कळे निश्चिती कवणा हें ॥ २७ ॥

करीत असतां पादसंवाहन। लावूनि नामीं अनुसंधान ॥
मधेंच हें फुटाण्यांचें आख्यान। कैसेंनि उत्पन्न जाहलें ॥ २८ ॥

इतुका काळ सेवेंत जातां। कधींच कां ना पडले हे तत्वतां ॥
हावेळ राहिले हीच आश्चर्यता। सकळांच्या चित्ता वाटली ॥ २९ ॥

कोठूनि फुटाणे तेथें आले। वळियांवरी कैसे स्थीरावले ॥
जे ते आश्चर्य करून राहिले। मग बाबा वदले ते परिसा ॥ ३० ॥

---

१ श्रीमंत गोपाळराव बुटी. २ श्री. हरि सीताराम दीक्षित. ३ चिकटलेले ४ अंगांत असलेले शॉर्ट कोटाची. ५ वळकटया.

शिक्षणाच्या विलक्षण पद्धती । अनेकांच्या अनेक असती ॥
बाबा जयांची जैसी गति । शिक्षण देती त्या तैसें ॥ ३१ ॥
पद्धती विचित्र महाराजांची । सरणी स्मरणीय बहु मजेची ॥
अन्यत्र तैशी देखिल्या ऐकिल्याची । नाहीं प्रचीती मजप्रती ॥ ३२ ॥
म्हणती याला वाईट खोडी । एकेकटें खाण्याची गोडी ॥
आज बाजाराची साधूनि घडी । फुटाणे रगडीत हा आला ॥ ३३ ॥
एककटें खाणें बरें नव्हे । ठावी मला त्याची सवे ॥
हेच फुटाणे याचे पुरावे । उगा नवलावें कशास ॥ ३४ ॥
मग मी म्हणे कोणा न देतां । ठावें न खाणें माझिया चित्ता ॥
तेथें या खोडीची कैंची वार्ता । अंगीं चिकटतां चिकटेना ॥ ३५ ॥
बाबा मी आज हा वेळभर । पाहिला नाहीं शिरडीचा बाजार ॥
गेलोंच तरी फुटाणे घेणार ? । मग खाणार हें पुढेंच ॥ ३६ ॥
असेल त्यासही असो गोडी । माझी तों नाहीं ऐसी खोडी ॥
दुजिया न देतां आधीं थोडी । वस्तू मी तोंडीं घालीना ॥ ३७ ॥
मग बाबांची पहा युक्ति । कैसी जडविती निजपदीं भक्ति ॥
ऐकोन ही माझी स्पष्टोक्ति । काय वदती लक्ष द्या ॥ ३८ ॥
संन्निध असेल तयास देसी । नसल्यास तूं तरी काय करिसी ॥
मी तरी काय करावें त्यासी । आठवतोसी काय मज ॥ ३९ ॥
मी नाहीं का तुझ्या जवळ । देतोस काय मजला कवळ ॥
ऐसें फुटाण्याचें हें मीष केवळ । तत्व निश्चळ ठसविलें ॥ ४० ॥
देवता प्राण अग्नी वंचन[1] । वैश्वदेवांतीं अतिथी वर्जन ॥
करूनि करिती जे पिंड पोषण । महदूषण त्या अन्ना[2] ॥ ४१ ॥

---

१ इंद्रियाधिष्ठित व इतर देवता प्राणापानादि पंचप्राण गार्हपत्यादि-पंचाग्नि. २ फसविणें.

वाटेल हें लहान तत्व । व्यवहारीं लाविता अति महत्व ॥
रसास्वादन नों उपलक्षणत्व । पंच विषयत्व या पोटीं ॥ ४२ ॥

विषयीं जयासीं हव्यास । परमार्थ न धरी तयाची आस ॥
तयांवरी जो घालील कास । तयाचा दास परमार्थ ॥ ४३ ॥

"यदा[१]पंचाव तिष्ठंते"[२] । या मंत्रें जें श्रुति वदते ॥
तेंच बाबा या थट्टेच्या निमित्तें । दृढ करिते जाहले ॥ ४४ ॥

शब्दस्पर्शरूपगंध । या चतुष्टयाचाही हाच संबंध ॥
किती बोधप्रद हा प्रबंध ॥ कथानुबंध बाबांचा ॥ ४५ ॥

मन बुद्ध्यादि इंद्रियगण । करूं आदरितां विषयसेवन ॥
करावें आधीं माझें स्मरण । तें मज समर्पण अंशांशें ॥ ४६ ॥

इंद्रियें विषयांवीण राहती ॥ हें तों न घडे कल्पांतीं ॥
ते विषय जरीं गुरुपदीं आपती । सहजीं आसक्ति राहील ॥ ४७ ॥

काम तरी मद्विषयींच कामावें । कोप आल्या मजवरींच कोपावें ॥
अभिमान दुराग्रह समर्पावे । भक्तीं वहावे मत्पदीं ॥ ४८ ॥

काम क्रोध अभिमान । वृत्ती जंव उठती कडकडून ॥
मी एक लक्ष्य लक्षून । मजवरीं निक्षून सोडाव्या ॥ ४९ ॥

क्रमेंक्रमें येणेपरी । वृत्ति निकृंतन करील हरी ॥
मग या विखारत्रयाच्या लहरी । तो परिहरील गोविंद ॥ ५० ॥

किंबहुना हें विकार जात । मत्स्वरूपींच लय पावत ॥
किंवा मद्रूपचि तें स्वयें होत । विश्रामत मत्पदीं ॥ ५१ ॥

ऐसें होतां अभ्यसन । वृत्ति स्वयेंच होती क्षीण ॥
कालांतरें समूल निर्मूलन । वृत्तिशून्य मन होई ॥ ५२ ॥

---

१ विषयावर २ कठोपनिषद् अ० २ वल्ली ३ मं. १०.

गुरु असे निरंतर संनिधी । ऐसी वाढतां दृढ बुद्धी ॥
तयास या ऐसिया विधी । विषय न बाधी कदाही ॥ ५३ ॥

जेथ हा सद्भाव ठसला । तेथची भवबंध उकलला ॥
विषयोविषयीं गुरु प्रकटला । विषयचि नटला गुरुरूपें ॥ ५४ ॥

यत्किंचित विषय सेवनीं । वावा आहेत संन्निधानीं ॥
सेव्या सेवता विचार मनीं । सकृद्दर्शनीं उठल ॥ ५५ ॥

असेव्य विषय सहजचि सुटे । व्यसनी भक्ताचें व्यसन तुटे ॥
असेव्यार्थीं मनही विटे । वळवितां नेहटें[१] हें वळण ॥ ५६ ॥

विषय नियमनीं होई सादर । वेद त्या नियमाचा आकर[२] ॥
विषय सेवी मग नियमानुसार । स्वेच्छाचार वर्तेना ॥ ५७ ॥

ऐसी सवयी लागतां मना । क्षीण होती विषयकल्पना ॥
आवडी उपजे गुरुभजना । शुद्धज्ञाना अंकुर ये ॥ ५८ ॥

शुद्ध ज्ञान लागतां वाढी । देहबुद्धीची तुटे बेडी ॥
ते बुद्धि दे अहंब्रम्हीं बुडी । सुख निर्वडी मग लाहे ॥ ५९ ॥

जरी हा देह क्षणभंगुर देख । तरी हा परम पुरुषार्थ साधक ॥
जो प्रत्यक्ष मोक्षाहून अधिक । कीं भक्तियोगप्रदायक हा ॥ ६० ॥

चारी पुरुषार्थांच्यावरी । या पंचम पुरुषार्थाची पायरी ॥
कांहीं न पावे या योगाची सरी । अलौकिक परी भक्तीची ॥ ६१ ॥

गुरु सेवेनें जो होई कृतार्थ । तयां आकळे हें वर्म यथार्थ ॥
भक्तिज्ञान वैराग्य स्वार्थ । तोचि परमार्थ पावेल ॥ ६२ ॥

गुरु आणि देव यांत । भेद पाही जयाचें चित्त ॥
तेणे अखिल भागवतांत । नाहींचं भगवंत देखिला ॥ ६३ ॥

---

१ दृढाभ्यासानें २ मूळठिकाण.

वाचिलें अखिल रामायण। ठावी न रामाची सीता कोण ॥
सांडूनिया द्वैत दर्शन। गुरुदेव अभिन्न जाणावे ॥ ६४ ॥

घडतां गुरुसेवा निर्मळ। होईल विषयवासना निर्मूळ ॥
चित्त होईल शुद्ध सोज्वळ। स्वरूप उज्वळ प्रगटेल ॥ ६५ ॥

असो इच्छाशक्ति होतां प्रबळ। फुटाणे बाबांचे हातचा मळ ॥
याहून विलक्षण करितां खेळ। त्यां काळवेळ लागेना ॥ ६६ ॥

केवळ पोटाचिया ओढी। ऐंद्रजाली लौकिकी गारोडी ॥
फिरवून भारली हाडाची कांडी। पदार्थ काढी मानेतो ॥ ६७ ॥

साईनाथ अलौकिक गारोडी। काय तयांच्या खेळाची प्रौढी ॥
इच्छा होतां न भरतां चिपडी। फुटाणे काढील अगणीत ॥ ६८ ॥

परी या कथेचें सार काय। तेथेंच आपण घालूं ठाय ॥
पांचा पोटीं कोणताही विषय। बाबांशिवाय सेवूं नये ॥ ६९ ॥

मनास देतां ही शिकवण। वेळोवेळीं होईल आठवण ॥
देतां घेतां साई चरण। अनुसंधान राहील ॥ ७० ॥

हे शुद्ध ब्रह्म सगुण मूर्ति। नयनासमोर राहील निश्चिती ॥
उपजेल भक्ति मुक्ति विरक्ति। परम प्राप्ति लाधेल ॥ ७१ ॥

नयनीं देखतां सुंदर ध्यान। हरेल संसार भूक तहान ॥
हरपेल ऐहिक सुखाचें भान। मन समाधान पावेल ॥ ७२ ॥

ओवी नाठवे आठवूं जातां। परी ती आठवे जात्यावर बसतां ॥
तैसीही चणकलीला कथितां। सुदामकथा आठवली ॥ ७३ ॥

---

१ जो पाहिजे तो. २ एकक्षण.

एकदां रामकृष्ण सुदामा । सेवीत असतां गुर्वाश्रमा ॥
लांकडे आणावयाचे कामा । कृष्ण बळरामा पाठविलें ॥ ७४ ॥
गुरुपत्नीचिया नियोगें । कृष्ण बळराम अरण्यमार्गें ॥
निघाले मात्र तों तयांच्या मागें । सुदामा संगें पाठविला ॥ ७५ ॥
तयापाशीं दिधले चणे । क्षुधा लागतां फिरतां अरण्यें ॥
तिघांही हे भक्षण करणें । गुरुपत्नीनें आज्ञापिलें ॥ ७६ ॥
पुढें रानांत कृष्ण भेटतां । " दादा तहान लागली म्हणतां " ॥
फुटाण्याची वार्ता न करितां । परिसा वदता झाला तें ॥ ७७ ॥
अनशेपोटीं पाणी न प्यावें । म्हणे सुदामा क्षणैक विसावें ॥
परी न वदे हे चणे खावे । कृष्ण विसावे मांडीवर ॥ ७८ ॥
पाहून लागला कृष्णाचा डोळा । सुदामा चणे खाऊं लागला ॥
दादा कायहो खातां हा कसला । आवाज वदला कृष्ण तदा ॥ ७९ ॥
कायरे खाया आहे येथें । थंडीनें द्विजपंक्ती थुडथुडते ॥
विष्णु सहस्त्र नामही मुखातें । स्पष्टोच्चारितें येईना ॥ ८० ॥
ऐकून हें सुदाम्याचें उत्तर । सर्वसाक्षी कृष्ण परात्पर ॥
म्हणे मलाही स्वप्न खरोखर । पडलें बरोबर तैसेंच ॥ ८१ ॥
एकाची वस्तू दुजा खातां । कायरे खातोस ऐसें वदतां ॥
खाऊं काय माती तो म्हणतां । वाणी तथास्तुता प्रगटली ॥ ८२ ॥
अरे हें स्वप्नचि वरें दादा । आपण मजवीण खाल का कदा ॥
खातां काय हा प्रश्नही तदा । स्वप्नाच्या नादांत पुसियेला ॥ ८३ ॥
पूर्वाश्रमीं सुदामजीला ॥ असती ठावी कृष्णलीला ॥
तरी हा नसता प्रमाद घडला । नसता भोगिला परिणाम ॥ ८४ ॥

---

१ गुरु सांदीपनी यांच्या आश्रमीं सेवा करीत असतां. २ आज्ञेने.
३ विसावा घे. ४ दात. ५ तसेंच होवो.

तो तरी काय साधारण। अठरा विश्वे दारिद्र्य घन ॥
तरी एकेकटे खाती जे जन। त्यांनीं हें स्मरण ठेवावें ॥ ८५ ॥

कृष्ण परमात्मा जयाचा सखा। ऐसा हा भक्त सुदाम्यासारिखा ॥
नीतीस यत्किंचित होतां पारखा। पावला धोका संसारीं ॥ ८६ ॥

तोच स्वस्त्री कष्टार्जित। प्रेमें मुठभर पोहे अर्पित
कृष्ण होऊनि प्रसन्नचित्त। ऐश्वर्य तृप्तकरी तया ॥ ८७ ॥

असो आतां आणीक एक। वार्ता कथितों बोधप्रदायक ॥
आधीं आनंद विनोद सुख। बोध प्रमुख जी अंतीं ॥ ८८ ॥

कोणास आवडे परमार्थ बोध। कोणास तर्कयुक्ति वाद ॥
कोणास आवडे थट्टा विनोद ॥ आनंदी आनंद सकळांतें ॥ ८९ ॥

हीही होती एक थट्टा। बाईबुवा पेटले हट्टा ॥
साई दरबारीं माजला तंटा। तुटला न बट्टा लागतां ॥ ९० ॥

हीही कथा परम सुरस। श्रोतयां आनंददायी बहुवस ॥
भक्त भांडतां अरस परस। हास्य रस पिकेल ॥ ९१ ॥

भक्त दामोदर* घनःश्याम। बावरे जयाचें उपनाम ॥
अण्णा चिंचणीकर टोपण नाम। प्रेम निःसीम बाबांचें ॥ ९२ ॥

---

* याना अण्णा चिंचणीकर या नावाने बहुधा ओळखीत. हे व याचे कुटुंब हीं दोहींजणे श्री साईबाबांची फार भक्ती करीत. हीं दोघे कित्येक वर्षें त्यासाठीं शिर्डीसच जाऊन राहिलीं होतीं. अण्णाचें कुटुंब थोडे वर्षांवर आपले गावीं असतां वारले व त्यांचे पाठीमागून लौकरच अण्णाही आपले गावीं असतांच कैलासवासी झाले. त्यांनीं आपली स्थावरजंगम सर्व इस्टेट मोठ्या प्रेमाने श्रीचे खर्चासाठीं श्रीशिर्डी संस्थानास अर्पण केली. या मासिकाचा शके १८४५ चा अंक १२ यांत त्यांचे मृत्यूपत्राची नक्कल छापली आहे.

स्वभाव मोठा खरमरीत। कोणाचीही न धरित मुर्वत ॥
उघड बोलणें विहिताविहित। हिताहित पाहती ना ॥ ९३ ॥
वृत्ती अण्णाची जितकी कडक। तितकीच सालस आणि सात्विक ॥
आगें जैसी भरलेली बंदुक। लाविलां रंजूक भडका ये ॥ ९४ ॥
सकळ कामीं तडका फडकी। उधारीची वार्ता न ठाउकी ॥
न धरी कुणाची भीडभाड कीं। रोखठोकी व्यवहार ॥ ९५ ॥
वेळीं धरवेल विस्तव हातीं। अण्णा तयाहून प्रखर अती ॥
परी ही निष्कपट स्वभाव जाती। तेणेंच प्रीति बाबांची ॥ ९६ ॥
असेच एकदां दोनप्रहरीं। मशीदींत भर दरबारीं ॥
वामहस्त कठड्यावरी। बैसली स्वारी बाबांची ॥ ९७ ॥
बाबा पाहती तटस्थपणें। नकळत लावीत भक्तांचीं भांडणें ॥
संपतां रागावणें वा रुसणें। उभयां समजावणें अखेर ॥ ९८ ॥
कोणी बाबांची कूस दावीत। कोणी पादसंवाहन करीत ॥
कोणी पाठपोट चेपीत। सेवा करीत ये रीती ॥ ९९ ॥
बाबा बालब्रह्मचारी। उर्ध्वरेते शुद्धाचारी ॥
करूं देत सेवा चाकरी। नरनारीं समस्तां ॥ १०० ॥
अण्णा बाहेर ओणवे राहती। हळूहळू वामहस्त दाबिती ॥
तों उजवे बाजूची परिस्थिति। स्वस्थ चित्तीं ऐकावी ॥ १०१ ॥
तिकडे होती एक बाई। अनन्य भक्त बाबांचे पायीं ॥
बाबा जीस म्हणत आई। मावशीबाई जन लोक ॥ १०२ ॥
मावशीबाई म्हणत सर्व। वेणूबाई
कौजलगी हें आडनांव। अनुपम भा
अण्णाची उलटली पन्नाशी। तोंडात
पोक्त वयस्करही ती

स्वभाव मोठा खरमरीत। कोणाचीही न धरित मुर्वत ॥
उघड बोलणें विहिताविहित। हिताहित पाहती ना ॥ ९३ ॥
वृत्ती अण्णाची जितकी कडक। तितकीच सालस आणि सात्विक ॥
माथें जैसी भरलेली बंदुक। लावितां रंजूक भडका घे ॥ ९४ ॥
सकळ कामीं तडका फडकी। उधारीची वार्ता न ठाउकी ॥
न धरी कुणाची भीडभाड कीं। रोखठोकी व्यवहार ॥ ९५ ॥
वेळीं धरवेल विस्तव हातीं। अण्णा तयाहून प्रखर अती ॥
परी ही निष्कपट स्वभाव जाती। तेणेंच प्रीति बावांची ॥ ९६ ॥
असेच एकदां दोनप्रहरीं। मशीदींत भर दरबारीं ॥
वामहस्त कठड्यावरी। बैसली स्वारी बाबांची ॥ ९७ ॥
बाबा पाहती तटस्थपणें। नकळत लावीत भक्तांचीं भांडणें ॥
संपतां रागावणें वा रुसणें। उभयां समजावणें अखेर ॥ ९८ ॥
कोणी बाबांची कूस दाबीत। कोणी पादसंवाहन करीत ॥
कोणी पाठपोट चेपीत। सेवा करीत ये रीती ॥ ९९ ॥
बाबा बालब्रह्मचारी। उर्ध्वरेते शुद्धाचारी ॥
करूंदेत सेवा चाकरी। नरनारीं समस्तां ॥ १०० ॥
अण्णा बाहेर ओणवे राहती। हळूहळू वामहस्त दाबिती ॥
तों उजवे बाजूची परिस्थिति। स्वस्थ चित्तीं ऐकावी ॥ १०१ ॥
तिकडे होती एक बाई। अनन्य भक्त बाबांचे पायीं ॥
बाबा जीस म्हणत आई। मावशीबाई जन लोक ॥ १०२ ॥
मावशीबाई म्हणत सर्व। वेणूबाई मूळ नांव ॥
कौजलगी हें आडनांव। अनुपम भाव साईपदीं ॥ १०३ ॥
अण्णाची उलटली पन्नाशी। तोंडात नव्हती बत्तीशी ॥
पोक्त वयस्करही ती मावशी। तंटा उभयाशीं उद्भवला ॥ १०४ ॥

अण्णा सहकुटुंब करीत सेवा। आई होती विगतधवा॥
दावितां बाबांचे पोट कुसवा। नावरे निश्वास[1] तियेस॥ १०५॥
श्रीसाई सेवेसी सबळ। मावशीबाई मनाची निर्मळ॥
उभय हस्तीं घालूनिपिळ। मांडली मळणी पोटाची॥ १०६॥
पाठीमागून निरणावेरी[2]। धरूनि बाबांस दोहीं करीं॥
दाबदाबून घुसळण करी। जैसी डेरी[3] ताकाची॥ १०७॥
साईनामीं लावूनि लय। मावशीबाई दावी निर्भय॥
बाबाही न करीत हायहूय। वाटे निरामय जणूं तयां॥ १०८॥
दाबण्याची विलक्षण परी। पोटपाठ सपाट करी॥
प्रेमचि ते परी ते अवसरीं। दया अंतरीं उपजवी॥ १०९॥
साईच हें निष्कपट प्रेम। देऊनि घेती सेवा अनुत्तम॥
कीं तें निजस्मरण अविश्रम। घडोहो क्षेम भक्तांस॥ ११०॥
आपुली तपश्चर्या ती किती। जेणें लाधावी ही संतसंगती॥
परी साईच दीनवत्सल निश्चिती। उपेक्षीती न भक्तांतें॥ १११॥
काय त्या हेलकाव्यांचि कुसरी। बाबा हालत खालींवरीं॥
तीही हाले तैशिया परी। नवल परी ही सेवेची॥ ११२॥
अण्णा ओणवे परी स्थीर। बाई आपुल्या सेवेंत चूर॥
तेणें होई मुख खालवर। मग काय प्रकार वर्तला॥ ११३॥
साई सेवेचिया सुखा। पिळितां पोट खातां झोका॥
सन्निध अण्णाचिया मुखा। आलें अवलोका मुख तिचें॥ ११४॥
पाहूनिया ऐसी संधी। मावशीबाई मोठी विनोदी॥
म्हणे कायहो अण्णा नादी। मुका आधीं मागे मज॥ ११५॥

---

१ श्वासोश्वास २ नेसण्याचे धोत्राची गाठ जेथें येते तो पोटाचा पुढील भाग ३ माथणी

पिकल्या केसाची लाज नाहीं । घेतोस माझा मुका पाहीं ॥
ऐसें वदतां मावशीबाई । अण्णा बांही सरसावी ॥ ११६ ॥
म्हणे मी इतुका थेरडा । मी काय मूर्ख अगदींच वेडा ॥
तूंच तोंड लावुनी तोंडा । सजलीसी भांडाया मजसीं ॥११७॥
पाहूनिया मातली कळ । बाबांस तया दोघांची कळकळ ॥
करावया दोघांसी शीतळ । युक्ति प्रबळ योजिती ॥ ११८ ॥
प्रेमें म्हणती अरे अण्णा । उगाच रे कां मांडिला दणाणा ॥
अनुचित काय तेंच समजेना । मुका घेतांना आईचा ॥ ११९ ॥
परिसोनी मनीं दोन्हीं विरमलीं । विनोदवाणी ठायींच जिरली ॥
सप्रेम हास्या उकळी फुटली । थट्टा ती रुचली अवघियां ॥ १२० ॥
पाहूं जातां कथा थोडी । मार्मीक श्रोते घेतील गोडी ॥
ठाय कैसा घालावा हे परवडी । कथेंत रोकडी दिसेल ॥ १२१ ॥
माय लेकांत जैसी प्रीति । प्रेमबुद्धी उभयतांत असती ॥
तेथेंही कळ उद्भवली नसती । क्रोध वृत्ती उठतीच न ॥ १२२ ॥
चाबुकें हाणिता हांसे उसळे । फुलाच्या मारें रडें कोसळे ॥
वृत्तीचे तरंग भावना बळें । कोणास नकळे अनुभव हा ॥ १२३ ॥
नवल बाबांची सहज युक्ति । बोल बोलती समयोचिती ॥
जेणें श्रोते अंतरीं निवती । बोधही घेती तात्काळ ॥ १२४ ॥
ऐसेंच एकदां पोट रगडतां । उपजली बाबांच्या परमभक्ता ॥
कळकळ दया आणि चिन्ता । तिची अतिरेकता पाहूनी ॥ १२५ ॥
म्हणती बाई द्या करा । ही का अंग दावण्याची तऱ्हा ॥
अंतरीं थोडी कींव धरा । तुटतील शिरा बाबांच्या ॥ १२६ ॥
कानीं पडतां इतुकीं अक्षरें । बाबा स्थानावरूनि सत्वरें ॥
घेऊनि अपुला सटका निजकरें । भमी प्रहारे ताडिली ॥ १२७ ॥

---

१ अस्तन्या.

चढली वृत्ती दुर्धर क्षोभा। समोर कोण राहील उभा ॥
नेत्र खदिरांगार प्रभा। फिरती सभोंवार जैं ॥ १२८ ॥
अंधारीं मार्जारांचीं बुबुळें। तेवीं चमकती दिवसा डोळे ॥
वाटे नयनींचिया ज्वाळें। आतांच जाळीतील सृष्टी ॥ १२९ ॥
सटक्याचें टोंक दोहातीं धरलें। पोटाचिया खळगींत खोंचलें ॥
दुजें खांबांत समोर रोविलें। घट्ट कवळिलें खांबाला ॥ १३० ॥
सटका लांब सव्वाहात। शिरला वाटे सबंध पोटांत ॥
आतां स्फोट होऊनि प्राणांत। ओढवेल क्षणांत तें वाटे ॥ १३१ ॥
खांब अढळ तो काय हाले। बाबा जवळी जवळी भिडले ॥
खांबास पोटाशीं घट्ट आवळिलें। पाणी पळविलें देखल्यांचें ॥१३२॥
आतां होईल पोटाचा स्फोट। जो तो तोंडात घाली बोट ॥
बाप हा काय प्रसंग दुर्घट। ओढवलें संकट दुर्धर ॥ १३३ ॥
ऐसी लोक करिती चिंता। काय करावें या आक्रांता ॥
एवढें संकट त्या मावशीकरितां। भक्ताधीनता हें ब्रीद ॥ १३४ ॥
कधीं कोणीही सेवा करितां। मध्येंच दर्शवितां अनुचितता ॥
किंवा सेवेकऱ्यास कोणी बोलतां। बाबांचे चित्ता खपेना ॥ १३५ ॥
भक्ता प्रेमळा आलें जीवा। मावशीबाईस ईशारा द्यावा ॥
साईबाबांस आराम व्हावा। परिणाम यावा कां ऐसा ॥ १३६ ॥
असो देवास आली करुणा। शान्तता उद्भवली साईचें मना ॥
सोडूनिया ते भयप्रद कल्पना। येऊनि आसना बैसती ॥ १३७ ॥
भक्त प्रेमळ जरी निधडा। बाबांचा स्वभाव पाहूनि करडा ॥
लाविला तेथूनि कानास खडा। घेतला धडा पुढारा ॥ १३८ ॥
तेव्हांपासूनि निश्चय केला। जावें न कोणाच्याही वाटेला ॥
येईल जैसें ज्यांचे मनाला। तैसें तयाला करूं द्यावें ॥ १३९ ॥

समर्थ स्वयें सामर्थ्यवंत । निग्रहानुग्रह ज्ञानवंत ॥
गुणावगुण सेवक जनांत । आपण किमर्थ पहावे ॥ १४० ॥
एकाची सेवा साईस सुखकर । दुजयाची ती असती प्रखर ॥
हे तरी निजबुद्धीचे विकार । खरा प्रकार आकळेना ॥ १४१ ॥
असो आतां हा थट्टा विनोद । घेणारा घेईल यांतील बोध ॥
साईकथा रसामोद । भक्तमकरंद सेवोत ॥ १४२ ॥
हेमांड साईपदीं लीन । पुढील अध्याय याहूनि गहन ॥
भक्त दामोदराची इच्छा पूर्ण । साई दयाघन करितील ॥ १४३ ॥
तोही मोठा चमत्कार । दामोदर संसारत्रस्त फार ॥
तयास पाचारून आपुले समोर । घालविला घोर तयाचा ॥१४४॥

इति श्री संतसज्जन प्रेरिते । पंत हेमांड विरचिते ॥
श्रीसाईसमर्थ सच्चरिते । विनोद विलसितं नाम ॥
चतुर्विंशतितमोऽध्यायः संपूर्णः ॥

॥ श्री सद्गुरू साईनाथार्पणमस्तु शुभं भवतु ॥

या मासिकांत आरंभापासून प्रसिद्ध होत असलेल्या श्रीसाईसच्च-
रितावर रावबहादूर श्री. चिंतामणराव विनायक वैद्य एम्. ए.
एल् एल्. बी. कल्याण यांचा अभिप्राय.

साईलीला मासिकांत येणारे रा. दाभोळकर गोविंद रघुनाथ हे लिहीत असलेले श्रीसाईसच्चरित मी मोठ्या प्रेमाने वाचतो. या चरित्रांत भक्ति व ज्ञान या दोहोंचे उत्तम आविष्करण होत आहे व ते अनुभवाच्या मार्गानें होत असल्याने ग्रंथाची भाषा गोड व गंभीर अशीच येत आहे. ओंव्यांतील चारी यमकें सहज प्रयत्नाविना साधलेलीं असतात, व विषयही मनोवेधक रीतीने मांडलेला असतो. श्री—साईचरित्राला मला वाटते, हेमाडपंत हे महिपतीच लाधले आहेत. संतचरित्र गाण्यास काव्य व भक्तिरसाची जोड नेहमींच लागते व या दोहोंचाही मिलाफ या चरित्रात चांगला व्यक्त होतो."

---



## आख्यान–रत्न–माला, नांदेड.

या मालेंत अर्वाचीन कवींचीं रचलेलीं कीर्तनोपयोगी आख्यानें दिली जातील ह. भ. प. संतकवी दासगणू महाराजांचीही प्रेमळ व प्रासादिक आख्यानें येतील

वर्षांतून सहा पुस्तकें निघतील. पुस्तकाचा आकार डेमी अष्टपत्री, पृष्ठ सं. ४८ प्र. पु. किं. ८ आणे.

एक रुपया प्रवेश फी भरणारास पाउणपट किंमतींत पुस्तक मिळेल. एकदम सहा पुस्तकांची किं. प्र. फीसह ३। रु.

**ग. अ. सराफ, नांदेड.**



श्री. हरि सीताराम उर्फ काकासाहेब दीक्षित यांचा श्रीशिर्डी येथील वाडा.

# श्री सद्गुरुसाईनाथ प्रसन्न.

मा. न. वि. वि. अर्थ व टीपासह २१ संस्कृत पद्यरूपी तुक दूर्वांकुरांची जुडी श्री शारदेसह श्रीसाईगणेशसद्गुरूंना अर्पण करीत आहे तरी वरील ओबडधोबड जुडीस आपल्या श्री साईलीलेत स्थान मिळेल अशी आशा आहे.

श्लोक. १–८ वंदननमनाष्टकम्

९ सद्गुरुनामत्रयम्.

१०–१२ नामसार्थत्वम्.

१३ नाथनामसार्थत्वम्

१४ ममसर्वस्वम्

१५ सद्गुरुनामाब्धिमज्जनफलम्

१६–१९ आकांक्षा.

२०–२१ प्रार्थना.

## —वंदननमनाष्टकम—

प्रहर्षिणी.

विघ्नेशं गजवदनं गणेशसाईम् ।
क्रीडन्तं विविधविलासनृत्यगीतैः ।
वाग्देव्याऽमृतमधु विद्यया च सार्धम् ।
वंदे त्वां स्मितमुखशारदासमेतम् ॥ १ ॥

अर्थ—विघ्नांचा नाश करणारे, गजवदन, नानाप्रकारचे विलास नृत्य व गीत यांनी वाचादेवी व अमृतमय अशी जी मधुविद्या म्हणजे ब्रह्मविद्या या दोघींबरोबर क्रीडा करणारे आपण गणराजसाई त्या आपणा गणराजास हास्यवदन शारदेसहवर्तमान वंदन करितो.

उपजाति

परावरं सद्गुरु दत्तराजम् । ज्ञानेश्वरं सद्गुरुमाधिराजम् ॥
उमावरं सद्गुरुसाइराजम् । कैवल्यदं राजगणं नमामि ॥ २ ॥

अर्थ—आपण परा म्हणजे श्रेष्ठ जी चौथी ज्ञानवाचा तिचे प्रत्यक्ष ईश सद्गुरु दत्तराज आहां. त्याचप्रमाणे आपण प्रत्यक्ष लक्ष्मीरमण विष्णू असे सद्गुरु ज्ञानराज आहां तसेच आपण प्रत्यक्ष उमावर शंकर असे सद्गुरु साइराज आहां मुक्तिफल देणारे आपणच राजत्रय, त्या आपणास मी नमस्कार करतो

रथोद्धता.

दत्तपादकमलं कमनीयम् । ज्ञानराजसुपदं रमणीयम् ॥
साइनाथचरणं स्मरणीयम् । पूजये त्रिपदमादरणीयम् ॥ ३ ॥

अर्थ—दत्तवतार बाबाचे पदकमल सुंदर आहे. ज्ञानेश्वरावतार बाबाचे सुंदर पद मनोहर आहे. साइनाथचरण स्मरण करण्यास योग्य आहेत. या प्रमाणें सन्माननीय अशीं जीं तीन्हीं आपलींच पदें त्याचीं मी पूजा करतो.

शार्दूलविक्रीडितम्.

संसारश्रमनाशशांतितरवे मित्राय तुभ्यं नमः ।
सद्भक्त्या जगदात्मने च रवये नित्यं नमस्ते नमः ।
तेजःपुंजखगोलशीर्षमणये सूर्याय तुभ्यं नमः ।
लावण्योदधिभानवे भगवते नित्यं नमस्ते नमः ॥ ४ ॥

चिद्रत्नाय खगाय संविहरते दिव्याम्बरे ते नमः ।
पूष्णे पुष्टिविवर्धकाय जगतो नित्यं नमस्ते नमः ।
विद्युत्कांतिहिरण्यगर्भविभवे रम्याय तुभ्यं नमः ।
आनंदाय मरीचिने च शिरसा नित्यं नमस्ते नमः ॥ ५ ॥

आदित्याय नमोऽस्तु तेजनिधये श्रीशाय तुभ्यं नमः ।
लीलाबुद्धिविकासकायखलु ते नित्यं सवित्रे नमः ।
अर्काख्यास्तु नमो नमो द्युतिमते श्रीशाय तुभ्यं नमः ।
चिद्‌ज्ञानोदयकारकाय च नमः श्री भास्करायास्तु ते ॥६॥

साष्टांगप्रणिपात पुष्पस्त्रगियं भक्त्यार्पिता ते मया
प्रीत्या स्वीकुरु नाथ तामनुदिनं योगेश्वर त्राहि माम् ।
श्रीसाईशचिदात्मदत्तगुरवे भूयः पुनस्ते नमः ।
भूयश्चापि पुनर्नमोस्तु शतशः भूयो नमस्ते नमः ॥७॥

अर्थ.—संसारश्रमापासून तापलेल्यास शांति (छाया) देणारे वृक्षरूपी **मित्र** त्या आपणास माझा नमस्कार. सर्व जगाचा आत्मा असे जे **रवि** त्या आपणास उत्तम भक्तीनें माझा निरंतर नमस्कार. आकाशांतील तेजःपुंज गोलकांतील शिरोमणि जे **सूर्य** त्या आपणांस माझा नमस्कार भगवान् सौंदर्यसागर जे **भानू** त्या आपणास माझा नित्य नमस्कार. दिव्य आकाशांत स्वच्छंद विहार करणारे चैतन्यरत्न जे **खग** त्या आपणास माझा नमस्कार. विश्वाची पुष्टि वर्धन करणारे जे **पूषन्** त्या आपणास माझा नमस्कार. विजेप्रमाणे प्रकाशमान मनोहर जे **हिरण्यगर्भ** विभु त्या आपणास माझा नमस्कार. आनंदरूप जे **मरीची** त्या आपणांस माझा सदासर्वदा साष्टांग नमस्कार. तेजसमुद्र व बुद्धिचे मालक जे **आदित्य** त्या आपणास माझा नमस्कार. खरोखरच लीलेने बुद्धीचा विकास करणारे जे **सविता** त्या आपणास माझा अखंड नमस्कार. लक्ष्मीरमण सौंदर्यवान् जे **अर्क** त्या आपणांस माझा नमस्कार. ब्रह्मज्ञानाचा अंतःकरणांत उदय करणारे जे **भास्कर** त्या आपणाला माझा नमस्कार. ही बरा साष्टांग नमस्काररूपी कुसुममाला भक्तीनें आपणाला अर्पण केली आहे. तरी हे योगेश्वर, तिचा प्रेमानें स्वीकार करून माझें निरंतर आपण संरक्षण करा. दत्तगुरु श्रीसाईराज चैत-

च्चन परमात्मा यास मी पुन्हः पुन्हः नमस्कार करतो. आणखीं पुन्हः पुन्हः हजार वेळा पुनः नमस्कार करतो.

मन्दाक्रान्ता.

मंदाकिन्याः कमिव विशदं यस्य पादारविंदात्।
मंदं मंदं मधुर मकरंदं स्रुतं स्वादुगन्धम्।
भक्त्या चास्वादितमतिमुदा साधुवृंदैर्मिलिन्दैः।
वंदे साई तमचलपदं सच्चिदानंदकंदम् ॥ ८ ॥

अर्थ—ज्याच्या पदकमलापासून भागिरथीच्या पाण्याप्रमाणे स्वच्छ व ज्यास गोड सुवास येत आहे असा, हळुहळु मधुर मद गळतो आहे व ज्याचा स्वाद भक्तीनें व परम आनंदाने संतरूपी भ्रमर घेत आहेत, त्या अढळपद व सत्ताचैतन्य व आनंद याचा गड्डा असे जे साइ त्यास मी वंदन करतो.

# सद्गुरुनामत्रयम्.

अनुष्टुप्

साइनाथ इति ख्यातः। साइराज स्तथैव च।
साइ बाबेति विज्ञातः। सार्थनामत्रयं गुरोः ॥ ९ ॥

अर्थ—महाराजाना कोणी साइनाथ म्हणतात. कोणी त्यांस साइराज असे म्हणतात. कोणी त्यास साइबाबा असे म्हणतात. सद्गुरूंचीं ( महाराजांची ) तिन्ही नांवे अर्थपूर्ण आहेत म्ह. अन्वर्थक आहेत.

---

टीपः—१. "साइ" हा शब्द छंद जुळविण्याकरिता कित्येक ठिकाणी इकारान्त ऱ्हस्व "हरि" शब्दाप्रमाणें घेतला आहे, व कित्येक ठिकाणी इन्नत "करिन्" शब्दाप्रमाणें घेतला आहे

२ 'बाबा' हा शब्द, त्यांत कांहीं बदल न करिता तसाचा तसाच ठेविला आहे, व सर्वांस येथें त्याचा तसाच उपयोग केला आहे

# नामसार्थत्वम्

इंद्रवज्रा.

१०. सार्वज्ञ इष्टदः साइ । नाभिजन्मा थनाशकः ।
साइनाथ इतिख्यातः । अत एव महीतले ॥ १० ॥

अर्थ–बाबा सर्व जाणणारे, इष्ट देणारे प्रत्यक्ष ब्रह्मदेव व ( भव ) भयाचे नाश करणारे म्हणून त्यास या धरिणीतलावर साइनाथ असे म्हणतात.*

इंद्रवज्रा.

११. साक्षात्स इन्दिरा कान्तः । रामोऽयं जानकीधवः ।
अतः स साइराजेति । विज्ञातो मेदिनीतले ॥ ११ ॥

अर्थः—बाबा प्रत्यक्ष इंदिराकांत विष्णू व जानकीरमण प्रभु राम आहेत. म्हणून त्यास या जगतितलावर **साईराजा** असे म्हणतात.

---

* मागील श्लोकात सांगितल्याप्रमाणे सद्गुरूची नांन्ही नावे कशी सार्थ आहेत ते १०, ११, व १२ या श्लोकांत दाखविले आहे. साइनाथ या शब्दातील पहिल्या "सा" या अक्षराचा अर्थ "सार्वज्ञ" "इ" या अक्षराचा अर्थ "इष्टद" म्ह० इच्छित फल देणारा "ना" या अक्षराचा अर्थ "नाभिजन्मा" म्ह० ब्रह्मदेव व "थ" या अक्षराचा अर्थ भय ( भवभय ) नाश न करणारा, म्हणून सर्व जाणणारे इप्सित देणारे व संसार भय नाश करणारे ते ब्रह्मदेवस्वरूप साइनाथ आहेत.

टीप–साइराजा या शब्दातील "राजा" हा शब्द मराठीप्रमाणेच वापरला आहे. साइराजा या शब्दातील पहिल्या "सा" या अक्षराचा अर्थ "साक्षात्" "इ"चा अर्थ "इन्दिराकांत" "रा"चा अर्थ "राम" व "जा"चा अर्थ जानकीपति" म्हणून साक्षात् राम व विष्णूस्वरूप ते "**साइराजा**" आहेत.

इन्द्रवज्रा

साम्ब ईश ईश्वरः साई । बाबा वै बालबान्धवः ।
अतः स साइबाबेति । विश्रुतो भूमिमण्डले ॥ १२ ॥

अर्थः—बाबा हे प्रत्यक्ष शंकर परमात्मा व अज्ञान दीनबन्धू आहेत म्हणून त्यास या भूमंडलावर साइबाबा असे म्हणतात.

## नाथनामसार्थत्वम् (वसततिलका)

नाथा भवन्ति बहवो भुवि मानवेषु ।
मुञ्चन्ति ते भवभयान्न कदापि दीनान् ।
श्रीसाइनाथ सदृशो विरलोऽपि नाथः ।
कुर्वन्ननाथनिजभक्तवरान् सनाथान् ॥ १३ ॥

अर्थः—या भूतलावर मनुष्यामध्ये नाथ ( नावाचे ) पुष्कळ आहेत परंतु ते दीन जनांना केव्हांही संसारभयापासून मुक्त करीत नाहींत. आपल्या अनाथ व श्रेष्ठ भक्तांना सनाथ करणारा श्रीसाइनाथासारखा दुसरा खरोखर क्वचितच नाथ असेल.

## ममसर्वस्वम् ( पृथ्वी. )

मदीय जननी भवान् जनकबंधुवर्गो भवान् ।
मदीय सुहृदो भवान् सुभगशांतकांतो भवान् ।
मदीयमखिलं भवान् सदय साइनाथ प्रभो ।
भवत्पदरजो विना नहि परं न जाने नहि ॥ १४ ॥

---

टीपः—" साईबाबा " यांतील " सा " चा अर्थ " साम्बशंकर " " ई " चा अर्थ " ईश्वर " पहिल्या " बा " चा अर्थ " बाल-अज्ञान, दीन, व दुसऱ्या " बा " चा अर्थ " बान्धव " म्हणून ते साक्षात् दीनबधु-शंकरस्वरूप आहेत.

अर्थः—हे दयालु प्रभो साइनाथ, आपणच माझी आई, आपणच माझे जनक, व आप्तसंबंधी अहा आपणच माझे कल्याण करणारे मित्र त्याचप्रमाणे भाग्यशाली शांत व सुंदर असे ईश अहा माझे जे काहीं म्हणून आहे ते सर्व आपणच अहा आपल्या पायाच्या रज:कणावांचून खात्रीने व खोरवरच मी दुसरें काहींच जाणत नाहीं

## सद्गुरुनामाब्धिमज्जनफलम्.

पृथ्वी

त्वदीय किल सद्गुरो सुरसनिम्ननामार्णवः
नभीः सलिल सेवने नहि निमज्जनं नाशकृत् ।
त्वदब्धिसुनिमग्नधीः भवति धाविताहंकृतिः ।
पुनश्च ननु विंदते मधुरमुक्तिमुक्ताफलम् ॥ १५ ॥

अर्थः—हे सद्गुरो, खोखरच आपला नामसमुद्र पिण्याला गोड व पोहण्याला खोल आहे. त्याचे पाणी प्यायल्यापासून (कारण ते खारट नाहीं) बिलकुल भय नाहीं. तसेंच त्यांत बुडण्यापासून खात्रीने नाश होत नाहीं. (इतकेंच नव्हे तर) आपल्या सागरात जो खूप बुडून राही-त्याच्या (देह) अहंकाराचे (मल) क्षालन होते, व त्याशिवाय त्यास खात्रीने मधुर मुक्तिरूपी मौक्तिक फळ उपभोगास मिळतें.

## आकांक्षा.

आर्या.

मनुजाकारांमूर्तिम् मुनिमुकुटमणिं मुकुंदमीशानम् ।
कल्पांगकुसुमकीर्तिं कांक्षे साई कठोरकालहरम् ॥ १६ ॥

---

१ टीप —या कवितेत खार समुद्र व नामसमुद्र यांची तुलना केली आहे.

१ कल्पांग—कल्प + अग कल्प म्ह. कल्पित किंवा इच्छित देणारा. अग म्ह. वृक्ष अ म्हणजे नाहीं, ग म्हणजे गमन किंवा गति ज्याला तो—अग सर्वांचा मिळून अर्थ इच्छित फळ देणारा किंवा मनोरथ पुरविणारा कल्पवृक्ष.

अर्थ—मनुष्यरूप धारण केलेली मूर्ती, मुनिशिरोरत्न, प्रत्यक्ष विष्णु व शंकर, कल्पवृक्षाच्या फुलाप्रमाणे ज्याची कीर्ती व जे निर्वाणकालाचा नाश करणारे असे गुरुराज साई त्याची मी इच्छा करतो.

उपेंद्रवज्रा ( उपजाति )

न रत्नमुक्ताभरणानि कांक्षे ।
कांक्षे विरक्तिं न तथा च मुक्तिम् ।
आभातितत्सर्वमिदं गुरो मे ।
सत्यं च मुक्ताफलशुक्तिरेव ॥ १७ ॥

अर्थ—रत्न मोत्ये वगैरेंच्या दागिन्याची ( संपत्तीची ) इच्छा नाहीं त्याचप्रमाणे वैराग्याची आणि मोक्षाचीही इच्छा नाहीं. हे गुरो, खरोखरच हें सर्व मला मोत्याच्या शिंपल्याच्या भासाप्रमाणे दिसते. ( म्ह. वरील सर्व गोष्टी आभासिक म्हणून मिथ्या आहेत असे वाटते. )

उपेंद्रवज्रा.

भोक्तुं न शक्तिं विषगर्भभोगान् ।
उक्तिं न श्रोतुं कविपंडितानाम् ।
कांक्षे सुभक्तिं तव पादकंजे ।
हृद्यां स्थिरामव्यभिचारिणीं च ॥ १८ ॥

अर्थ:—विषानें भरलेले विषयभोग भोगण्यास शक्ति मिळविण्याची इच्छा नाहीं. त्याचप्रमाणें कवि व पंडितांचीं वचने ( व्याख्याने ) ऐकण्याची इच्छा नाहीं. फक्त आपल्या चरणकमलीं उत्कट आनंद देणारी अचल व एकनिष्ठ भक्तीची इच्छा करतो.

शार्दूलविक्रीडितम्

सावित्रीवर विश्वसृट् च जगतो यः पालकः श्रीधरः ।
यो गंगाधरशंकरश्च वरदो विश्वस्य संहारकः ।
एवं यस्त्रिगुणात्मको ऽपि विगुणो दत्तावतारो गुरुः ।
सः साई भगवांश्चिरं वसतु मे हृन्मंदिरे सुंदरे ॥ १९ ॥

अर्थः—बाबा हे प्रत्यक्ष विश्व उत्पन्न करणारे सावित्रीरमण ब्रह्मदेव, जग पालन करणारे प्रत्यक्ष श्रीश विष्णू व ब्रह्मांड संहार करणारे प्रत्यक्ष गंगाकांत शंकर आहेत. या प्रमाणे हे गुरुराज त्रिगुणात्मक दत्तावतार असूनही निर्गुण आहेत. असे ते साई सद्गुरुराज माझ्या अंतःकरणरूपी सुंदर मंदिरात निरंतर वस्ती करोत.

## प्रार्थना

प्रहर्षिणी

हे स्वामिन् त्वरितमपावृणु प्रसीद ।
भांडारं तव करुणाधनस्य पुण्यम् ।
संभृत्येश्वर मम धीपुटं धनेन ।
सस्नेहं परिहर धीश बुद्धिदैन्यम् ॥ २० ॥

अर्थ—हे प्रभो, आपल्या करुणारूप द्रव्याचा पुण्यखजिना कृपा करून लवकर उघडा, व त्या कृपाद्रव्याने माझी बुद्धिरूप पोतडी भरा व ममतेने, हे बुद्धिनायक, माझे बुद्धिदारिद्र्याचा परिहार ( नाश ) करा.

प्रहर्षिणी.

तन्मूले सततमथोद्यमं करिष्ये ।
तद्वृध्यां सुरस शुभाः कथास्त्वदीयाः ।
आख्यातुं कुरु सदयं क्षमं प्रभो माम् ।
याचे त्वां सुविनतबालमंद बुद्धिः ॥ २१ ॥

टीप — २० व २१ हे दोन श्लोक, श्रीज्ञानेश्वरीतील १४ व्या अध्यायातील प्रथम नमनाच्या ओव्यांपैकीं १७ व १८ या दोन ओव्यांची कल्पना घेऊन, रचले आहेत

अर्थ.—त्या ( करुणाघनरूपी ) भाडवलावर मी निरंतर व्यापार करीन व त्यात जे व्याज मिळेल त्या व्याजात, हे प्रभो, कल्याणकारक व गोड अशा आपल्या कथा सांगण्यास ( लिहिण्यास ) मला आपण दयेने समर्थ करा इतकी आपल्याजवळ अतिनम्रपणाची जडबुद्धि अज्ञानाची ( बालकाची ) प्रार्थना आहे.

बाबांचें बाळ

---

पद–चाल–(श्रीगुरुचे चरणकंज)

सद्गुरुतें नित्यकाळ प्रेमें तूंचि ध्याई।
प्रेमें तूंची ध्याई, प्रेमें तूंची ध्याई ॥ धृ ॥
अंतरि तूं सांई धरिं। नामामृत पान करीं ॥
इतर पंथा दूर सारीं। भावें त्यासीं गांईऽऽ ॥ २ ॥

नेम व्रतां सोडुं नको। इतर साधु निंदुं नको ॥
अहंभाव धरूं नको। हीच भाक घेईऽऽ ॥ ३ ॥

उद्धवेशं तुज विनवी। गुरुपदीं भाव ठेवी ॥
सर्वकाळ गाई ओवी। नित्य स्मरत जाई ॥ सद्गुरुतें ॥४॥

---

टीप:— १ नांव घेणें ( नाव हेंच सार अमृत ) २ सांप्रदाय. ३ अहंकार ४ शपथ, ( आण, वचन ) ५ कर्त्याचें नांव.

## श्रीसाईबाबांचे भक्तांस खालीलप्रमाणे नोटीसा अलीकडे सुटत आहेत.

श्रीसंस्थान कमिटीची नेमणूक अहमदनगर डिस्ट्रिक्ट कोर्टाने इ. स. १९२२ मध्ये केली हे आपल्या स्मरणात असेलच. कमिटींत असलेल्या १५ असामीपैकीं ५ जण ट्रस्टी आहेत आणि त्यांची नेमणूक कोर्टानें तहाहयात केली आहे. बाकीचे १० जणाची नेमणूक तीन वर्षांकरिता करून त्यानंतर त्याची निवडणूक दर तीन तीन वर्षांनीं भक्तमंडळाकडून होत जावी असे सदर कोर्टानें संस्थानच्या योजनेमध्ये नमुद केले आहे.

भक्तमंडळाच्या रचनेसंबंधाने नियम करण्याचा अधिकार संस्थान कमिटीस कोर्टानें दिला आहे. या अधिकाराअन्वयें कोर्टानें केलेल्या नियमाची एक प्रत आपले माहिती करितां यासोबत पाठवीत आहे. नवीन निवडणूक या नियमांअन्वये होईल.

सोबतचे नियम पहाता आपल्याला असे आढळून येईल कीं भक्तमंडळाचे आश्रयदाते, तहाहयात वर्गणीदार आणि सामान्य वर्गणीदार असे ३ वर्ग केले आहेत आणि त्या निरनिराळे वर्गांस कमिटीपैकी अनुक्रमे ४, ३ व ३ असे सभासद निवडण्याचा अधिकार आहे. निवडणुकीची वेळ जवळ आली असल्याकारणानें निरनिराळे वर्गाचे मतदार संघाची यादी लवकर करणे जरूर आहे. म्हणून आपणास हे पत्र लिहून विनंती करीत आहे कीं, आपले नाव कोणत्या वर्गांत घालावें हे कृपा करून ता. २५ जानेवारीपर्यंत संस्थानचे खजीनदार रा. रा. गोविंद रघुनाथ दाभोलकर यास नं. ५ सेंट मार्टिन्स रोड वांद्रे बी.बी.सी. आय. या पत्त्यावर लेखी कळवावें आणि त्याच म्हणजे ता. २५ जानेवारीपर्यंत ज्या वर्गांत

आपले नाव घालावयाचें असेल त्या वर्गाची नियमात ठरविलेली रक्कम संस्थानचे सदर खजिनदाराकडे पावती करावी आश्रयदात्यामध्ये नाव घालावयाचे असेल तर कायम फंडात ५०० रुपये भरले पाहिजेत. सहाय्यात वर्गणीदारात नाव घालावयाचें असेल तर कायम फंडात १०० रुपये भरले पाहिजेत आणि साधारण वर्गणीदारात नाव घालावयाचे असेल तर शके १८४५ अखेरपर्यंतची सर्व वर्गणी भरली पाहिजे. असे आपल्याला सोबतच्या नियमावरून स्पष्ट कळून येईल अर्थात् आपल्याकडून यापूर्वी कायम फंडासाठीं काहीं वर्गणी आली असेल तर ती वरील रकमेत आपल्यास मुजरा देण्यात येईल (म्हणजे अनुक्रमे ५०० किंवा १०० रु यात) नियमाप्रमाणे वर्गणी आली म्हणजेच आपले नाव घालता येईल. आपल्याकडून आतांपर्यंत कायमफंडाला रु. आले आहेत आणि कोठीफंडाला म्हणजे संस्थानचे चालू खर्चाला आपलेकडून पावेतो वर्गणी आली आहे. त्यानंतरची वर्गणी येणे आहे

कळावें बहुत काय लिहिणें लोभ असावा; हे विनंती

आपला

**हरि सीताराम दीक्षित.**

चिटणीस शिर्डीसंस्थान कमिटी.